# भूमिका व ऋणनिर्देश

'सखा कलाल यांच्या कथांचा अभ्यास' हा विषय एम्.फिल.च्या लघुप्रबंधासाठी निवडताना डॉ. ल.रा. नशिराबादकर, मराठी विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि डॉ. कन्हैया कुंदप, मराठी विभाग प्रमुख, एस.जी.एम. कॉलेज, कराड यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करुन विषय निश्चित केला.

मी ग्रामीण भागातील असल्यामुळे माझे महाविद्यालयीन शिक्षण सुरु झाल्यापासून मला ग्रामीण साहित्याची आवड निर्माण झाली होती. त्यामुळे ब-याचशा ग्रामीण कथाकारांच्या कथा मी वाचलेल्या होत्या. साहजिकच एम्.फिल.साठी कोणत्यातरी ग्रामीणकथाकारांच्या कथांवरच लघुप्रबंध लिहावा असा विचार मनात घोळत होता. याच दरम्यान गुरुवार दि. 22 ऑगस्ट 1991 च्या "दै.सकाळ" मधील "कलारंग" पुरवणीमध्ये "जिद्दी साहित्यिक" या शीर्षकाखाली मीना शेटे यांनी कलालांची घेतलेली मुलाखत छापून आली. ती मुलाखत वाचल्यानंतर या लेखकाविषयी माझ्या मनात कुतूहल निर्माण झाले. याअगोदर त्यांचा "ढग" हा कथासंग्रह वाचलेला होताच. परंतु ही मुलाखत वाचल्यानंतर माझ्या मनात विचार आला की, लघुप्रबंधासाठी कलालांच्या कथांचा अभ्यास करावा. परंतु या विषयावर कोणी लघुप्रबंध लिहिला आहे का? याची खात्री करुन घेण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथालयात गेलो. तेथे प्रबंधसूची पाहिली. या विषयावर अद्याप लघुप्रबंध लिहिलेला नाही याची खात्री झाली. त्यानंतर डॉ. ल.रा. नशिराबादकर यांना भेटून यासंदर्भात चर्चा केली. हा

विषय घेण्यास हरकत नाही, असे त्यांनी सांगितले. नंतर डॉ. कुंदप यांच्याकडे आलो, त्यांच्याशी चर्चा करुन त्यांच्या संमतीने हा विषय निश्चित केला.

कलालांचे एकूण 'ढग' आणि 'सांज' असे दोनच कथासंग्रह आहेत. मार्गदर्शक डॉ. कन्हैया कुंदप यांच्या सल्ल्यावरुन कलालांच्या या दोन कथासंग्रहाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामध्ये मराठी ग्रामीण कथेची पूर्वपीठिका सांगून सखा कलाल समकालीन कथाकारांनी मराठी ग्रामीण कथेत कोणती भर घातली याविषयी विवेचन केले आहे. कलालांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण कशी झाली याविषयी थोडक्यात चर्चा करुन कलालांच्या कथेची आशयदृष्टया व रचनादृष्टया वैशिष्टये सोदाहरण मांडली आहेत. या लघुप्रबंधातील विवेचन, मते सर्वमान्य होतीलच असे नाही. मात्र या लघुप्रबंधात एका संशोधकाच्या भूमिकेतून सखा कलाल यांच्या कथांचा अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केला आहे.

प्रस्तुत विषयाचा अभ्यास करताना माझ्या अभ्यासाला दिशा देण्याचे काम माझे आदरणीय मार्गदर्शक डॉ. कन्हैया कुंदप यांनी केले. यांचे अत्यंत मोलाचे व प्रेमळ मार्गदर्शन लाभले. या मार्गदर्शनाबद्दल त्यांचे ऋण मानण्यासाठी शब्द अपूरे आहेत. केवळ आभार मानून त्यांच्या ऋणातून उतराई होणे शक्य नाही.

एम्. फिल.ला प्रवेश घेऊन तो पूर्ण करण्यासाठी सहकार्य व प्रेरणा देणारे आदरणीय प्राचार्य , पुरुषोत्तम शेठ, काकासाहेब चव्हाण महाविद्यालय, तळमावले आणि प्राचार्य अप्पासाहेब पानवळ, एस्.जी.एम. कॉलेज, कराड यांचा मी सदैव ऋणी आहे.

लघुप्रबंधासाठी आवश्यक महत्वाची अशी संदर्भपुस्तके मिळवून देण्यासाठी अनेकांनी सहकार्य केले. काकासाहेब चव्हाण महाविद्यालय, तळमावले, एस.जी.एम. कॉलेज, कराड, पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगांव, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथील ग्रंथपाल व ग्रंथालयातील इतर कर्मचारी यांच्या सहकार्याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी आहे.

माझे सहकारी मित्र प्रा. बी.के. जाधव, प्रा.एन.ए. पाटील, प्रा. ए.आर. पाटील, प्रा.बी.बी. गुरव, प्रा. डी.पी. कांबळे, प्रा. एस.बी. मोटे, संभाजी पाटील, प्रा. आबासाहेब बागल,

प्रा. पी.सी. दिवेकर, प्रा. एन.एम. वाघमारे, प्रा. के.एस. राजगुरु, प्रा. आर.आर. चौगुले, श्री सुभाषराव थोरात (क्लार्क), तासगांव कॉलेजचे प्रा. यशवंत पाटणे, प्रा. शंकर हदगल, पेठवडगांव कॉलेजच्या प्रा. सौ. एस.एस. मिसाळ, शिवाजी विद्यापीठातील मराठीचे प्रपाठक प्रा. डॉ. व्ही.के. शिंदे, नाईट कॉलेज कोल्हापूरचे प्रा. डॉ. प्रकाश कुंभार, प्रा. भैरव कुंभार या सर्वांनी मला सतत प्रेरणा दिली व सहकार्य केले त्याबद्दल या सर्वांचा मी सदैव ऋणी आहे. तसेच ज्योती इलेक्ट्रॉनिक्स टायपिंग सेंटर, कराडच्या संचालिका सौ. ज्योती नांदिडकर यांनी वेळेत व व्यवस्थित टायपिंग करुन दिले याबद्दल त्यांचा मी आभारी आहे.

xxxx